
आपल्या वाटण्या, आतल्या वाटण्या...
आपलं महानगर My महानगर.com
www.mymahanagar.com

# कर्मयोगी मामा कै. बाळासाहेब वाघ

प्रासंगिक
नीलिमा पवार

स्वातंत्र्यपूर्वीच्या काळात सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक गुलामगिरीविरुध्द निर्भयपणे डा खांद्यावर मिरविणाऱ्या काकासाहेबांच्या घरात रोज घडणाऱ्या स्थित्यंतराचा परिणाम सर्वात जास्त त्यांच्या कुटुंबावर होत होता. रोज नवनवीन संकटाला ह्या घराला, त्यात राहणाऱ्या प्रत्येकाला सामोरे जावे लागत होते. काकासाहेबांच्या कारकीर्दीत अशोकस्तंभाजवळील हनुमान घाटावर असलेला 'वाघ बंगला' म्हणजे या चळवळींचे एक प्रमुख केंद्र होते.



नानाविध क्षेत्रातील भाऊराव पाटील, मधू लिमये, केशवराव जेधे, नानासाहेब पाटील, रावसाहेब थोरात या मान्यवरांचा कायमच घरात राबता असायचा. मामा हे तेथील स्वयंस्फूर्त स्वयंसेवकच होते. प्रत्यक्ष अनुभव व मिळालेल्या सहवासामुळे हे घर सुसंस्कृत झाले. त्यात भाऊमामांची निरीक्षण व आकलनशक्ती इतकी अफाट होती की, त्यांनी अनेक चांगले संस्कार घेतले. एकदा तर भाऊराव पाटील तेथे आठ दिवस मुक्कामी होते तेव्हा साहजिकच त्यांची सर्व कामे भाऊमामांनी केली होती. मोठ्या लोकांच्या सहवासामुळेच ते निरलस, निरपेक्ष, निस्वार्थीपणे सेवा देत राहिले. काकासाहेब भूमिगत झाले अन् कळत-नकळत लहानपणापासूनच भाऊमामांना वडिलकीची भूमिका निभवावी लागली, ती कायमचीच. काकांची वैचारिक श्रीमंती व बाईंची स्थितप्रज्ञता हे दोन्ही संस्कार मामांमध्ये सारखेच वाढीला लागले आणि आजपर्यंत तो आलेख त्यांच्या जीवनभर वाढतच राहिला.

सुट्टीत आम्ही पाच-पन्नास नातवंडे नाशिकला एकाचवेळी आजोळी जमायचो. त्यावेळी आम्हाला सांभाळायची जबाबदारी भाऊमामांकडेच असायची. मितभाषी मामांचा दरारा आम्हाला अजूनही अंगावर काटा आणतो. तेव्हा कदाचित वेळप्रसंगी आम्हाला राग आला असेल किंवा वाईटही वाटले असेल पण आज त्रयस्थपणे बघताना असे लक्षात येते की, 'आपलं ते बाळ अन् दुसऱ्याचे ते कार्टं' ही वृत्ती मामांमध्ये कधीच नव्हती. भाऊ मामांना पोहण्याची मोठी आवड होती. सुट्टीत ते आम्हा सर्वांना हनुमान घाटावर पोहायला घेऊन जात. स्वतः रोज नित्यनियमाने हनुमान घाट ते पंपिंग स्टेशन व परत हनुमान घाटापर्यंत पोहत असत. ते पट्टीचे पोहणारे होते.

एक ध्येयवेडा माणूस म्हणून आम्ही त्यांच्याकडे पाहत आलो. सर्व सामाजिक व्यक्तिमत्त्वांमध्ये मी आदर्शाची जागा माझ्या भाऊमामांनाच देते. संस्थेसाठी मोठ्या निष्ठेने, निरपेक्ष भावनेने ते कार्य करीत राहिले. कोणतीही जबाबदारी त्यांनी स्वीकारली की मामा ती पूर्णत्वास गेल्याशिवाय थांबत नसायचे. फक्त त्यांना विचार पटले पाहिजेत. अन्यथा ते कोणाला सल्ला देत नसायचे किंवा नावही ठेवत नसायचे.

मामा खरे तर बी. एस्सी. ॲग्री आणि त्यांचा पिंड पण शेतकऱ्याचा होता. म्हणजे रोज नवनिर्मितीचा आनंद घेण्याचा! वृत्ती संशोधकाची, नित्य नव्या अभ्यासाची होती. मामांनी के. के. वाघ शिक्षण संस्थेत झाडे लावली. कर्मवीर काकासाहेब वाघ इंजिनिअरिंग कॉलेजवर कधीही जा, मामा जिथे बांधकाम चालू असेल तिथेच सापडतील. मामांना एकच व्यसन होते. ते म्हणजे जे काम हातात घेतले ते जिद्दीने, काटकसरीने पूर्ण करण्याचे. कुणाला कधी एक दमडी मामा देणार नाही पण कुणाची एक दमडीसुध्दा स्वतःसाठी कधीच वापरणार नाही. एवढे कशाला कारखान्यात व संस्थेतही त्यांनी काटकसरीने कारभार चालवला.

१९८६ मध्ये हॉस्पिटल मॅनेजमेंटच्या कोर्ससाठी पुण्याला असताना रानवड कारखान्याच्या कामासाठी दोन गाड्या आल्या होत्या. बकाऊ वुल्फ कंपनीत त्यांना काही मशिनरी बघायची होती. एका गाडीत सर्व डायरेक्टर होते व एका गाडीत मामा अन् ड्रायव्हर गाडी रिकामी होती. मला पण नाशिकला परतायचे होते. मामा म्हणाले, चल आमच्याबरोबर. अन् खरंच मी मामांबरोबर त्यांच्या गाडीत बसले. मामा सोबत आहेत म्हणून मी वगैरे काहीही सोबत घेतले नाही. त्यात रस्त्यात गाडी बिघडली. गाडी लवकर व्यवस्थित दुरुस्त व्हावी म्हणून ते तीन तास त्या मेकॅनिक जवळच उभे राहिले. दुसरी गाडी पाच मिनिट थांबली अन् पुढे ढाब्यावर मनसोक्त आडवा हात मारुन आली. आम्ही तिघे तिथेच. पहाटे निघालेलो आम्ही सायंकाळी बऱ्याच उशिराने घरी पोहोचलो. पोटात कावळे ओरडत होते अन् मनाला कुठेतरी वाईट पण वाटत होते. ड्रायव्हर म्हटले, हे नेहमीचेच आहे. त्यामुळे गाडीत पण कुणी बसणार नाही. मग अनुभवानंतर गाडी रिकामी का, हे माझ्या लक्षात आले.

एकदा एक गरीब व नात्यातला मुलगा माझ्याकडे मामांना नोकरीवर घेण्यासाठी आग्रह करु लागला. मात्र, त्याची मुलाखत चांगली झाली नाही आणि त्यांचे सिलेक्शन झाले नाही. पण मामांना सांगण्याची माझी हिम्मतच झाली नाही की, तुम्ही घ्या. मीच काय, सगळ्यांचाच हा अनुभव आहे की, मामाकडे नो वशिला आणि त्यामुळेच त्या संस्थेचा दर्जा टिकून आहे.

स्त्रीशिक्षण हा मामांचा आवडीचा विषय होता. स्त्री संताचा इतिहास मामा भक्तिभावाने आम्हाला सांगत असत. काकासाहेब वाघांनी मराठा विद्या प्रसारक समाजाचे सेक्रेटरी असताना उदोजी बोर्डिंगच्या परिसरात एक अभिनव प्रयोग फार दूरदृष्टीने सुरु केला होता. ज्या विद्यार्थ्याला जो व्यवसाय आवडेल त्याचे शिक्षण त्याने घ्यावे. त्याला शिक्षणाची, वयाची अट नसावी. दुर्दैवाने हा प्रयोग फसला. पण मामांना मात्र विद्यार्थ्यांची नस गवसली. मामांची विवेकबुध्दी सदैव जागी असणे हा त्यांच्यातील मोठा सत्वगुण. त्यामुळेच कलियुगातील शैक्षणिक पंढरीच्या ह्या वारकऱ्याच्या कर्मात सामर्थ्य आहे. जयंतीच्या निमित्ताने भाऊमामांची मते मुलाखत आणि लघुपट यातून लोकांपर्यंत पोहोचविल्यास ते भावी पिढीला नक्कीच मार्गदर्शक, दिशादर्शक ठरणार आहे. आम्हा सर्वांना ते नेहमीच दिशादर्शक असेच होते. अशा या मामांनी वयाची शंभरी गाठावी अशी ईच्छा होती पण नियतीने ती ईच्छा अपूर्णच ठेवली. **(लेखिका मविप्र संस्थेच्या माजी सरचिटणीस आहेत.)**


Powered by: erelego.com